## ७. खेळ आणि इतिहास

**प्रश्न १ ला. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१) खेळांचा इतिहास हा माणसांएवढा जुना आहे.

२) खेळाला आपल्या जीवनात महत्त्वाचे स्थान आहे.

३) सध्याच्या काळात खेळाचे अर्थकारण बदलले आहे.

४) खेळाद्वारे इतिहासावर प्रकाश पडतो.

५) खेळ व इतिहास यांचा निकटचा संबंध आहे.

**प्रश्न २ रा. थोडक्यात उत्तरे लिहा**.

१) खेळाची व्याख्या सांगा.

२) भारतीय प्राचीन साहित्यात कोण-कोणत्या खेळांचा उल्लेख येतो ?

३) खेळ व ग्रीक लोक यांचे प्राचीन काळापासूनचे नाते स्पष्ट करा.

४) सांघिक खेळ खेळल्याने कोणते फायदे होतात?

५) खेळाचे प्रकार किती व कोणते ?

६) मैदानी खेळाचे कोणते दोन प्रकार आहेत? प्रत्येकी दोन उदाहरणे द्या.

७) शारीरिक कौशल्यावर आधारित मैदानी खेळ कोणते?

८) साहसी खेळात कोण-कोणत्या खेळांचा समावेश होतो?

९) जागतिक पातळीवर कोण-कोणत्या खेळांच्या स्पर्धा होतात?

१०) भारताचा राष्ट्रीय खेळ कोणता?

११) खेळणी कशाला म्हणावे?

१२) खेळांमधून भारत-रोम संबंध कशा प्रकारे उजेडात आला?

१३) चित्रपट बनविताना कोण-कोणत्या गोष्टींचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे?

१४) खेळांच्या स्पर्धा सुरु असताना इतिहासाचा अभ्यास उपयुक्त का ठरतो?

१५) खेळांशी संबंधित क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी कशा प्रकारे निर्माण झाल्या आहेत?

१६) पंचांना कोठे कोठे काम करण्याची संधी मिळते?

१७) सध्या खेळांना कशा प्रकारे उत्तेजन दिले जात आहे ?